# बृहन्मुंबई महानगरपालिका

## क्रा.ज्यो.सा.फुले.म.न.पा. सर्वसाधारण रुग्णालय, कस्तुरबा क्रॉस रोड नं.2, बोरीवली (पू)

**क्र. एचओ / के.एस.पी.एच /2995/ एसआर दिनांक :11.10.2024**

## जाहिरात

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय, बोरिवली (पूर्व) येथील रुग्णालयाकरिता खालील नमूद 'वरिष्ठ प्रबंधक (Sr.Registriar)' व ' प्रबंधक (Registriar)' पदे कंत्राटी तत्वावर ६ महिन्यांच्या कालावधीसाठी (दर ३० दिवसांनी ०१ दिवस सेवाखंड देण्यात येईल ) भरण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील अर्ज रुग्णालयात उपलब्ध आहेत. या पदासाठी रु. ४२५ + १८ % GST इतके अर्ज शुल्क C.F.C विभाग येथे कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) स. १०.०० ते दु. ०१.०० या वेळेत भरण्यात यावे. अर्जदाराने विहित नमुन्यात अर्ज व आवश्यक शैक्षणिक अहर्ता प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र इत्यादी अर्जासोबत जोडून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले मनपा रुग्णालय, कस्तुरबा क्रॉस रोड नं.०२, बोरिवली (पूर्व), मुंबई ४०००६६ तेथे सादर करावा. (दूरध्वनी क्र. ०२२ २८०५०८८२, ०२२२८०५०१०५, ०२२२८०८९४०८)

| अनु. क्र. | पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | ठोख वेतन दरमहा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वरिष्ठ प्रबंधक (प्रसूती स्त्रीरोगतज्ञ) (Sr.Registriar) OBGY | 02 | 00 | 02 | Rs.82,386/- |
| 2. | प्रबंधक(प्रसूती स्त्रीरोगतज्ञ) (Registriar)OBGY | 02 | 00 | 02 | Rs.81,572/- |

**सर्वसाधारण अटी :-**

1. उमेदवारांची नेमणूक पूर्णत: कंत्राटी पद्धतीने असून (प्रत्येकी ३० दिवसांनी ०१ दिवस सेवाखंड आहे.) सहा महिन्यापेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीकरीता किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या कडून पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यंत जे अगोदर असेल एवढ्या कालावधीसाठी.

2. कंत्राटी पद्धतीने निवडण्यात येणाऱ्या उमेदवारांना ठोक वेतन वरीलप्रमाणे प्रतिमाह देण्यात येत आहे.

3. सदर पदांकरीत उमेदवारांचे वय अर्ज करताना ५८ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये. तसेच वयाची ५८ वर्षे पूर्ण होताच सेवा आपोआप संपुष्टात येईल.

4. सदर उमेदवारांस रुग्णालयांमध्ये संबंधितविभागांमध्ये चक्रांकित पद्धतीने तीनही सत्रांमध्ये तसेच रविवार आणि सार्वजनिक सुट्टी च्या दिवशी (कर्तव्यावर on call हजर) काम करावे लागेल.

5.निवड झालेल्या उमेदवारांनी रु. १००/- मात्र स्टॅम्पपेपर विहित नमुन्यामध्ये प्रतिज्ञापत्र करुन देणे गरजेचे आहे.

6. सदर उमेदवारास कंत्राटी नियुक्तीकरिता अहर्ता 'वरिष्ठ प्रबंधक (प्रसूती स्त्रीरोगतज्ञ)' व 'प्रबंधक(प्रसूती स्त्रीरोगतज्ञ) ' सुधारित अहर्तेप्रमाणे मान्यता प्राप्त विद्यापीठाची 'एमबीबीएस'(MBBS) पदवी व त्यानंतर संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी (एमडी(MD)/ एमएस (MS)/ डीएनबी (DNB)) प्राप्त झाल्यानंतर सुस्थापित रुग्णालयातील / चिकित्सालयातील या विनिर्दिष्ट विषयांतर्गत कामाचा एक वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव असावा. रुग्णालयातील संबंधित विभागाची संपूर्ण जबाबदारी सदर पदावर असल्याकारणाने तसेच बंधपत्रधारक उमेदवार, प्रबंधक, आणि आवास अधिकारी, तसेच सी पी एस विद्यार्थी यांना मार्गदर्शन करण्याची व त्यांच्या कामकाजावर देखरेख करण्याची जबाबदारी सदर पदांवर असल्याकारणाने पदव्युत्तर पदवी प्राप्त झाल्या नंतर कमीत कमी एक वर्षाचा अनुभव अत्यंत महत्वाचा आहे. यास्तव ह्या पदांकरिता अनअनुभवी बंधपत्रधारकांचा विचार करता येणार नाही.

7. उमेदवार 'महाराष्ट्र वैद्यक परिषदेकडे' (MMC) नोंदणीकृत असावा.

8. सदर उमेदवारांना मराठी भाषेचे गरजेपुरते ज्ञान आवश्यक आहे. (बोलणे, वाचणे)

9. सदर उमेदवारांना रुग्ण व त्यासंबंधित माहितीची संगणकात नोंद देण्याचे ज्ञान आवश्यक आहे.

10. उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवारांनी त्याबाबतचा (Notarised Affidavit) प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

11. निवड प्रक्रियेदरम्यान किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**कर्तव्ये व जबाबदारी :-**

1.सदर उमेदवार रुग्णालय प्रमुख / त्यांनी नेमून दिलेल्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांच्या अखत्यारीत आणि मार्गदर्शनाखाली काम करतील.

2.सदर उमेदवारांना उपनगरीय रुग्णालयाच्या अपघात विभाग / तात्काळ सेवा विभागात चक्रांकित पद्धतीने तीनही सत्रांत रविवार / सार्वजनिक सुट्टी / ओ पी डी सुट्टी मध्ये काम करावे लागेल व नियमानुसार प्रशासनाने / रुग्णालय प्रमुखांनी मंजूर केलेल्या ड्यूटी लिस्ट प्रमाणे साप्ताहिक सुट्टी मिळेल.

3. तसेच प्रशासनाने / रुग्णालय प्रमुखांनी नेमून दिलेल्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांच्या आदेशाने काही अपवादात्मक / आपत्कालीन परिस्थितीत आवश्यकतेनुसार रुग्णालयातील इतर विभाग, बाह्यरुग्ण विभाग, आंतर रुग्ण विभाग आणि अतिदक्षता विभाग येथे काम करावे लागेल.

4.सदर डॉक्टरांना रुग्णालयात काम करताना संबंधित विभागातील मार्गदर्शक तत्त्वे व कार्यप्रणालीचे पालन करावे लागेल. तसेच संबंधित रुग्णसेवेसाठीची न्याय-वैद्यकीय (Medico Legal) जबाबदारी घ्यावी लागेल.

5. सदर उमेदवारांनी रुग्ण व त्यांचे नातेवाईक व वरिष्ठ नागरिक, महापालिका वरिष्ठ कर्मचारी व महापालिका कर्मचारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, त्यांचे कार्यकर्ते यांच्याशी सौजन्याने वागावे.

6.सदर डॉक्टरांना रुग्णालयात काम करताना महापालिकेच्या नियमांचे उल्लंघन केल्यास अथवा काही आक्षेपार्ह वर्तन केल्यास तसेच संबंधित विभागातील कामकाजबाबत कार्यक्षमता केल्याचे निदर्शनास आल्यास अथवा रुग्णसेवेत निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

7.सदर उमेदवारांना निव्वळ कंत्राटी पद्धतीने सहा महिन्यापेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त केले असल्याने महापालिकेच्या कोणत्याही कायम स्वरूपातील पदावरील नियुक्ती करिता हक्क अथवा प्राधान्य मागता येणार नाही. तसेच ते महापालिकेच्या कायम स्वरूपातील पदावरील लाभ मिळण्यास पात्र ठरणार नाहीत.

**विशेष सूचना :-**

1.यापूर्वी अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्वीकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

2.टपालाने / कुरिअरने / ई-मेलद्वारे आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

3.अर्जाचे विहित मुल्य भरून त्याची पावती सोबत जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

सहि/- 11.10.2024

**मुख वैद्यकिय अधिकारी**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय,

कस्तुरबा क्रॉस रोड नं.02, बोरीवली (पूर्व).